**<u>शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र. ६ तर्फे विधीज्ञ श्री. कोठावळे यांच्यातर्फे</u>**

२१. मी माझे जन्मापासून पेल्हार येथे राहतो. माझे शिक्षण वर्ग सहावी पर्यंत झालेले आहे. वादी ही माझी आई आहे. माझी आई ही एक वर्षापूर्वी मयत झाली आहे. माझे आईस वारस म्हणून तीन मुले व दोन मुली होते. त्यापैकी माझा लहान भाऊ गणेश हा मयत झालेला आहे. माझे दोन बहिणी शेवंती केशव परेड व गुलाब मधुकर भोये हया मयत झालेल्या आहेत. माझी मयत बहिण शेवंती हीस परशुराम, लक्ष्मीबाई, जमनीबाई व संजय हे वारस आहेत. माझी मयत बहिण गुलाब हीस अनिल, शाना, प्रविण, प्रमिला हे वारस आहेत. माझे भावांनी मला त्यांच्यातर्फे न्यायालयात साक्ष दयावी म्हणून वेगळे कुलमुखत्यारपत्र लिहून दिलेले नाही. मला दाव्यातील मिळकतीबाबतची माहिती आहे. मी दाव्याचे कागदपत्रे पाहिलेले आहेत. माझी मयत आई जानकीबाई हिने सदरचा दावा दाखल केला तेव्हापासून मी न्यायालयात केसकामी येत असतो.

२२. दावा मिळकतीस प्लॉट नं. १८ असे देण्यात आलेला आहे. दावा मिळकत ही माझी आई जानकीबाई हिस शासनाकडून मिळालेली आहे. दावा मिळकत ही माझे आईस शासनाने दिल्याबाबतचे कागदपत्रे आमच्याकडे आहेत. तो दस्त आम्ही केसमध्ये दाखल केलेला नाही. सदरचा दस्त मी पुढील तारखेस केसमध्ये दाखल करु शकेन. हे मी सांगू शकत नाही की, दावा मिळकत जमिन ही माझे आईस शासनाने अटी व शर्तीवर दिली असेल. सदर दावा मिळकत माझे आईस शासनाने कायमस्वरुपी दिली होती का काही कालावधीकरीता दिली होती हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही माझे आईस शासनाने शेती करण्याकरीता दिली होती. दावा मिळकतीत घर बांधण्याकरीता माझे आईने परवानगी घेतली होती का हे मला माहिती नाही. दावा मिळकतीत आमची घरे ९ गुंठे जमिनीत असतील. दावा मिळकतीमध्ये सुरेश मिश्रा यांचा स्टोन क्रशरचा व्यवसाय आहे. तो व्यवसाय सन १९८३ पासून आहे. त्यांना ११ महिन्याचे कराराने जमिन भाडयाने दिलेली आहे. करारनामा हा प्रत्येक ११ महिन्याने वाढविला जातो.

स्पे.मु.क्र. ९५/२०११
नि.क्र. १५८

सध्या देखील सुरेश मिश्रा यांनी दावा मिळकतीत काही जमिनी त्यांच्या व्यवसायाकरीता दिलेली आहेत. त्याचे भाडे दरमहा रुपये १०,०००/— एवढे आहे. सदर व्यवसायाकरीता १५ ते २० गुंठे जमिन सुरेश मिश्रा यांना दिलेली आहे. सुरेश मिश्रा यांनी माझे आईचे नांव स्टोन क्रशर व्यवसायाची परवानगी शासनाकडून घेतलेली आहे. सदर परवानगीची एक प्रत आमचेकडे आहे. ती मी केसमध्ये दाखल करु शकतो. सदरची परवानगी ही तहसिलदार कार्यालयातून घेतलेली आहे. हे मला माहिती नाही की, सदर १५ ते २० गुंठे जमिनीकरीता माझे आईने बिगरशेती व्हावी म्हणून परवानगी घेतली होती किंवा नाही. सदर जागेत सुरेश मिश्रा यांनी दोन ते तीन केबिनचे बांधकाम केलेले आहे. सदर केबिन बांधण्याकरीता सुरेश मिश्रा किंवा माझे आईने परवानगी घेतली होती किंवा नाही हे मला माहिती नाही. पहिली केबिन सन १९८३ मध्ये बांधलेली आहे व दुसरी केबिन सन २००० मध्ये बांधली.

२३. हे म्हणणे खरे आहे की, स्टोन क्रशरने फुटलेले दगड हे ट्रकमधून बाहेर घेऊन जातात ते ट्रक दावा मिळकतीतूनच जातात. सदर ट्रक जाण्याकरीता दावा मिळकतीमध्ये कच्चा रस्ता आहे. सदर दावा मिळकतीतील रस्त्याने मुख्य रोडला जाण्याकरीता दोन मिनिट लागतात. सदरचा रस्ता हा एक ट्रक जावा एवढा रुंद आहे. दावा मिळकतीतील आमची राहती घरे व स्टोन क्रशरचा व्यवसाय यामध्ये एक भिंत बांधलेली आहे. सरदची भिंत ही कधी बांधलेली आहे हे आता मला आठवत नाही. सदरची भिंत ही दहा वर्षापूर्वीची आहे. ती विटांनी बांधलेली आहे.

मध्यान्हाची वेळ संपल्याने पुढील उलटतपास तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृती.

वसई
दि. २३/०१/२०१९

(एस.एन.भोसले)
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
वसई